21 OCT 2018
महाराष्ट्र टाईम्स

# मंगळवारी मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मंगळवारी (ता. २३) आयोजित केला आहे. विद्यापीठातील 'नॅक'चे समन्वयक डॉ. आर. के. कामत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ ते दुपारी तीन या वेळेत मानव्यशास्त्र सभागृहात मेळावा होणार आहे. विभागाच्या पाच विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मिळाला आहे. त्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

2 1 OCT 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भविष्याचा वेध घेणाऱ्या संशोधनास चालना द्यावी

## ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर : 'शिवाजी द ग्रेट'महाग्रंथाचे विद्यापीठात प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा घेऊन भविष्याचा साक्षेपी वेध घेणारे संशोधन संशोधकांनी करावे. अशा संशोधनाला विद्यापीठांनी चालना देणे आजची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.

थोर इतिहासकार डॉ. बाळकृष्ण लिखित आणि डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट" या चारखंडाच्या शिवचरित्र नूतन आवृत्तीचे प्रकाशन डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर शाहू छत्रपती महाराज, प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वेध घेतलेला आहे.



कोल्हापूर : 'शिवाजी द ग्रेट'या महाग्रंथाचे प्रकाशन शुक्रवारी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शाहू छत्रपती महाराज, प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया. शशिकांत मोरे)

यामध्ये शिवरायांच्या समकालीन परकीय वस्तुनिष्ठ संदर्भांच्या आधारे त्यांनी हा ग्रंथ साकारलेला आहे. त्यामुळे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सद्यस्थितीतील राजकीय, सामाजिक उत्क्रांतीच्या कारणांचा शोध व वेध घेण्यासाठी अशा ऐतिहासिक दस्तावेजांचे योगदान मोलाचे आहे. डॉ. बाळकृष्णांनी अथक संशोधनांती अत्यंत परिश्रमातून हा महाग्रंथ साकारला आहे. इतके मोठे शिवचरित्र मी प्रथमच पाहतो आहे. इतिहास संशोधकांच्यासह सर्वसामान्य शिवप्रेमींच्या दृष्टीनेही या ग्रंथाचे मोल मोठे आहे.

### मृत्यूशय्येवर असतानाही शिवचरित्राचा ध्यास

डॉ. बाळकृष्णांनी मृत्यूशय्येवर असतानाही शिवचरित्राचा ध्यास घेऊन ते पूर्ण केले. 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथाच्या माध्यमातून शिवरायांना वैश्विकस्तरावर नेण्याची कामगिरी डॉ. बाळकृष्ण यांनी केली आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाची स्थापना हे डॉ. बाळकृष्ण आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

**–डॉ. जयसिंगराव पवार, इतिहास संशोधक**

### आपण सारे शिवरायांचे नाव घेतो पण विचार घेत नाही...

'शिवाजी द ग्रेट' हा महाग्रंथ म्हणजे इतिहासाचा पाया आहे. छत्रपती शिवरायांचे आपण सारे नाव घेतो, मात्र त्यांचा विचार घेत नाही. या देशातील जनतेने या न्यायप्रीय राजाच्या चरित्रापासून दिशादर्शक प्रेरणा घेण्याची गरज आहे.

**–छत्रपती शाहू महाराज**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, सामाजिक विज्ञानामध्ये संशोधनाला मर्यादा आहेत, असे म्हणणारा आणि मानणारा एक मोठा संशोधक वर्ग आपल्याकडे आहे. एका संकुचित परिप्रेक्ष्यातून जर तुम्ही या अतिव्यापक विषयाकडे पाहात राहाल, तर एकही विषय संशोधनासाठी हाती लागणार नाही. संशोधकाने सर्वप्रथम आपला हा संकुचितपणा सोडून देऊन व्यापक दृष्टीने भूतकाळाकडे, वर्तमानाकडे पाहायला हवे आणि त्यातून त्याने भविष्याचा वेध घ्यायला हवा, असे मत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2018
Times of India

# Initiate activities to promote innovation: UGC to varsities

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked varsities and colleges across the country to initiate various activities for promoting innovation in startups and entrepreneurship.

In a circular dated October 15, UGC secretary Rajnish Jain said, "The start-ups, innovators and entrepreneurs from across the country have appreciably applied their creativity to address social issues. However, it is further needed that a culture of innovation and entrepreneurship must be promoted as there is no dearth of grassroots level innovators in the country and efforts must be made to facilitate their growth."

Accordingly, some specific steps have been advised by the UGC that include encouraging students of the universities and colleges to visit incubators, holding entrepreneurship focused events at colleges where successful entrepreneurs be invited to interact with students. It has also suggested setting up of entrepreneurship cells at colleges and adding entrepreneurship into curriculum.

Another few suggestions include setting up of incubators at institutes of higher education, setting up of intellectual property centres at universities, establishing 'innovative labs' on the model of 'Atal Tinkering Labs', and encouraging organisation of boot camps, mentoring and investor sessions, along with associating with various initiatives carried out by start-up India.

A city-based education expert said that with the availability of resources that this generation has there is no doubt that one can expect better innovations and to achieve that varsities and colleges should act on the various activities suggested by the UGC.

21 OCT 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या लौकिकात भर घालूया




शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेच्या मेळाव्यात कुलगुरू देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी आर. मोरे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. जी. एस. राशिनकर.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठाने प्रारंभापासून शिक्षण, संशोधन व सेवा क्षेत्रासाठी मोठे योगदान दिले आहे. येथील प्रत्येक विद्यार्थी हा विद्यापीठाचा वैभव असून त्यांनी जगभर विद्यापीठाचे नाव पोहचविले. भविष्यकाळातही विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासन अशा तीनही घटकांनी एकत्र येऊन विद्यापीठाच्या लौकिकात आणखी भर घालू,'असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

प्रशासनामार्फत अधिकृत नोंदणी केलेल्या शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेचा पहिला मेळावा शनिवारी आयोजित केला होता. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी 'विद्यापीठामुळे आयुष्याचे सोने झाले, विद्यापीठाचे ऋण फेडू 'असे कृतज्ञतापूर्वक उद्गार काढले. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आयोजित पहिल्याच विद्यार्थी मेळाव्यात जवळपास दोन लाख रुपयांची निधी जमा झाला.

'नॅक'चे सल्लागार व विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. जगन्नाथ पाटील यांनी विद्यापीठाला सव्वा लाख रुपये, प्राचार्य मोहन राजमाने यांनी २५ हजार , डॉ. भारती पाटील यांनी पाच हजार तर पलूस येथील कला, वाणिज्य व विज्ञान कॉलेजच्या पदवीधर विद्यार्थ्यांनी दहा हजार रुपयांची देणगी दिल्याची माहिती उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी दिली. शाहू कॉलेज विद्यार्थी संघामार्फत विद्यापीठातील कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. कुलगुरु शिंदे यांनीही विद्यार्थी संघटनेकडे ११ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. याप्रसंगी प्रा. एस. ए. कांबळे इस्लामपूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. तसेच विद्यार्थी संघटनेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन झाले.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या अनेकविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण केले. तसेच माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ विकासाच्या सूचना करताना जबाबदारी स्वीकारावी, अवे आवाहनही केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक तर माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्राचार्य डी. आर. मोरे यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी संघटनेच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. संदीप पाटील, विज्ञान परिषदेचे शिवाजीराव पवार,डॉ. ज्योती जाधव, प्रा. सचिन लोकापुरे, पल्लवी जोशी, तुकाराम सन्नके आदींनी मनोगत व्यक्त केले. 'नॅक'चे समन्वयक डॉ. आर. के. कामत, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अरुण चौगुले आदी उपस्थित होते. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

## इंग्रजी विभागाने स्वीकारली २५ लाखांची जबाबदारी

इंग्रजी विभागातील माजी विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाला २५ लाख रुपये देण्याची जबाबदारी यावेळी माजी विभागप्रमुख डॉ. पी. ए. अत्तार आणि प्राचार्य डी. आर. मोरे यांनी स्वीकारली. यावेळी डॉ. अत्तार म्हणाले, 'विद्यापीठाच्या लौकिकात भर घालण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी योगदान देण्याची आवश्यकता आहे. कॅम्पसमधील प्रत्येक विभागाने माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून २५ लाख रुपयांचा निधी विद्यापीठाला उपलब्ध करुन द्यावा. इंग्रजी विभागातर्फे विद्यापीठाला २५ लाखाचे अर्थसहाय करण्याची जबाबदारी आम्ही दोघे स्वीकारत आहोत.'

## कुलगुरू डॉ. शिंदेंचे माजी विद्यार्थ्यांना आवाहन

## देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात माजी विद्यार्थी मेळावा

# माजी विद्यार्थ्यांमुळे विद्यापीठाचा लौकिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा भार स्वीकारल्यानंतर विविध देशांत जाण्याचा योग आला. या ठिकाणी विद्यापीठाचे विद्यार्थी भेटले. संबंधित ठिकाणच्या कॉर्पोरेट जगतातील अधिकारी तसेच प्राध्यापक हे आपल्या विद्यार्थ्यांची कष्टाळू आणि समर्पित भावनेने काम करण्याची वृत्ती यांनी भारावून गेल्याचे दिसले. माजी विद्यार्थ्यांमुळे शिवाजी विद्यापीठाचा लौकिक जगभरात सर्वदूर पसरला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शनिवारी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात माजी विद्यार्थ्यांच्या मध्यवर्ती मेळाव्यात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान आहे. विविध देशांचे संशोधन क्षेत्र असो अथवा अर्थकारण या प्रत्येक क्षेत्रात आपले विद्यार्थी जागतिक स्तरावर मोलाचे योगदान देत आहेत. या पुढील काळात या विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या सर्वकष विकासामध्ये सामावून घेण्याचा संकल्पही कुलगुरुंनी बोलून दाखविला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वर्तमान स्थितीत विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांकडून विद्यमान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, तसेच सक्रिय योगदान अभिप्रेत आहे. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या अनुभवाचा लाभ विद्यापीठाला वेळोवेळी मिळवून द्यावा.

मेळाव्यास सुमारे २५० हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यांच्यातील काहींनी प्रातिनिधिक मनोगते व्यक्त केली. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेच्या स्वतंत्र संकेतस्थळाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले.

संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी उपक्रमांचा आढावा घेतला.

संघटनेचे सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, संघटनेचे खजिनदार अजित चौगुले यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात शनिवारी माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्यांचे विद्यापीठ विकासासाठी योगदान

- नॅक मूल्यांकनात माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या विकासात्मक कार्यासाठी दिलेले योगदान हा अनेक घटकांपैकी एक घटक आहे. त्यामध्ये माजी विद्यार्थ्यांनी किती रकमेचे योगदान दिलेले आहे यावर गुणांकन अवलंबून असणार आहे. याची पूर्ण जाणीव असलेले नॅकचे सल्लागार व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. जगन्नाथ पाटील यांनी पूर्वी जाहीर केल्यानुसार १,२५,००० रुपयांचा धनादेश संघटनेकडे पाठविला आहे.
- तसेच पलूस येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या पदवीधरांनी १० हजार रुपये, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी २५ हजार रुपये, डॉ. भारती पाटील यांनी ५००० हजार रुपये दिले. संघटनेचे अध्यक्ष तथा कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनीही ११ हजार रुपयांची देणगी संघटनेला दिली. तसेच, राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याभोवतीच्या उद्यानाच्या सुशोभीकरणाचा संपूर्ण खर्च करण्याची तयारी दर्शविली.

लोकमत

# 'मास कम्युनिकेशन'चा माजी विद्यार्थी मेळावा मंगळवारी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागामध्ये मास कम्युनिकेशनच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मंगळवारी (दि. २३) आयोजित करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या आय. क्यू. ए. सी.चे संचालक डॉ. आर. के. कामत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम ११ ते ३ या वेळेत वृत्तपत्रविद्या विभागाजवळील मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होणार आहे. याप्रसंगी विभागातील पाच माजी विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मिळाले असून, त्यांचाही सत्कार होणार असल्याची माहिती विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी दिली आहे.

Hello Kolhapur
Page No. 2 Oct 21, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

# माजी विद्यार्थ्यांमुळे विद्यापीठाचा लौकिक जगभर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माजी विद्यार्थ्यांमुळे शिवाजी विद्यापीठाचा लौकिक जगभरात सर्वदूर पसरला आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात आयोजित माजी विद्यार्थी मध्यवर्ती स्नेहमेळावाप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कुलगुरूपदाचा भार स्वीकारल्यानंतर विविध देशांत जाण्याचा योग आला. त्या ठिकाणी शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी भेटले. त्या त्या देशांचे संशोधन क्षेत्र, अर्थकारण अशा अनेक क्षेत्रांत विद्यार्थी जागतिक स्तरावर मोलाचे योगदान देत आहेत. पुढील काळात विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या सर्वंकष विकासामध्ये सामावून घेण्याचा संकल्प आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित स्नेहमेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर व्ही. टी. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

सादरीकरणाद्वारे माजी विद्यार्थ्यांना अवगत केले. मेळाव्यास सुमारे २५० हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेच्या स्वतंत्र संकेतस्थळाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी उपक्रमांचा आढावा घेतला. संघटनेचे सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, संघटनेचे खजिनदार अजित चौगुले आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाच्या विकासात विद्यार्थ्यांचे योगदान

नॅक मूल्यांकनात माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या विकासात्मक कार्यासाठी योगदान दिले आहे. यात माजी विद्यार्थ्यांनी किती रकमेचे योगदान दिले, यावर गुणांकन अवलंबून असणार आहे. नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी १ लाख २५ हजार रुपयांचा धनादेश संघटनेकडे पाठविला आहे. पलूस येथील कला, वाणिज्य महाविद्यालय पदवीधर, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, डॉ. भारती पाटील यांनी रोख स्वरूपात संघटनेला देणगी दिली आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याभोवतीच्या उद्यान सुशोभीकरणाचा खर्च उचलण्याची तयारी दर्शविली आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये जागतिक अन्नदिवस

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये जागतिक अन्नदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उद्योजक चिराग मेहता प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. मंजुषा देशपांडे, डॉ. ए. आर. कुलकर्णी, अधिविभागामधील फूड टेक्नालॉजी विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी आदी यावेळी उपस्थित होते.

# युवामहोत्सवात मेहंदी खुलणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विद्यापीठाच्या युवामहोत्सवातील विविध स्पर्धा सहभागी विद्यार्थ्यांबरोबरच पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना आनंद देऊन जातात. यंदाचा युवामहोत्सव २६ ऑक्टोबरपासून सुरू होत असून, फाईन आर्ट या प्रकारात समाविष्ट करण्यात आलेल्या मेहंदी स्पर्धेमुळे यंदाचा युवामहोत्सव अधिक खुलणार आहे.

**मेहंदी स्पर्धेचा प्रथमच समावेश**

आपल्या प्रलंबित विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्राध्यापकांच्या संघटनांनी १३ दिवस कामबंद आंदोलन पुकारले होते. त्यामुळे विद्यापीठाच्या काही परीक्षांसह क्रीडा स्पर्धा आणि युवामहोत्सवही २ वेळा पुढे ढकलावा लागला होता. अखेर २६ ऑक्टोबरपासून युवामहोत्सव सुरू होत आहे. या वर्षीचा विद्यापीठाचा ३८ वा मध्यवर्ती युवामहोत्सव आहे.

या युवामहोत्सवामध्ये प्रथमच मेहंदी या कला प्रकाराचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धकांना मेहंदी रेखाटण्यासाठी २ तास ३० मिनिटांचा वेळ दिला जाणार आहे.

आपल्यासोबत आणलेल्या व्यक्तीच्या हातावर ही मेहंदी रेखाटायची आहे. मेहंदीबरोबरच फाईन आर्ट प्रकारात मातीकाम, भित्तीचित्र, रांगोळी, कार्टूनिंग, इन्स्टॉलेशन (सांघिक रचना कृती) आणि पोस्टर मेकिंग या स्पर्धा होणार आहेत. त्याचबरोबर संगीत,



नृत्य, नाट्य, वाङ्मय या प्रकारात या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत.

पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होईल. त्यातील विविध स्पर्धांमधील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होणार आहेत. जिल्हास्तरीय महोत्सवाची सुरुवात या वर्षी सातारा येथून दि. २६ ऑक्टोबरपासून होणार आहे. यानुसार सातारा जिल्ह्याचा महोत्सव कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात दि. २६ ऑक्टोबर रोजी, कोल्हापूर जिल्ह्यातील महोत्सव दि. २७ ऑक्टोबरला महावीर महाविद्यालयात होईल. सांगली जिल्ह्याचा महोत्सव दि. २९ ऑक्टोबरला आटपाडीतील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात होणार आहे. मध्यवर्ती युवामहोत्सव सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात दि. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरदरम्यान रंगणार आहे.

या वर्षीचा राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' महोत्सव डिसेंबरमध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाची संघ निवड चाचणी ३ आणि ४ नोव्हेंबरला विद्यापीठात होणार आहे.

# माजी विद्यार्थ्यांमुळे विद्यापीठाचा लौकिक जगभर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
माजी विद्यार्थ्यांमुळे शिवाजी विद्यापीठाचा लौकिक जगभरात पसरला आहे. आपले विद्यार्थी जागतिक स्तरावर मोलाचे योगदान देत आहेत, त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शनिवारी सकाळी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात आयोजित माजी विद्यार्थ्यांच्या मध्यवर्ती मेळाव्यात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विविध देशांत जाण्याचा योग आला. त्या ठिकाणी मला शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी भेटले. संबंधित ठिकाणचे कॉर्पोरेट जगतातील अधिकारी तसेच प्राध्यापक हे आपल्या विद्यार्थ्यांची कष्टाळू आणि समर्पित भावनेने काम करण्याची वृत्ती यांनी भारावून गेल्याचे दिसले. या पुढील काळात या विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या सर्वंकष विकासामध्ये सामावून घेण्याचा संकल्पही कुलगुरूंनी व्यक्त केला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहात आयोजित माजी विद्यार्थ्यांच्या मध्यवर्ती मेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अन्य मान्यवर.**

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सादरीकरणाद्वारे माजी विद्यार्थ्यांना अवगत केले. मेळाव्यास सुमारे २५० हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यांच्यातील काहींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेच्या स्वतंत्र संकेतस्थळाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.

माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी उपक्रमांचा आढावा घेतला. संघटनेचे सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, संघटनेचे खजिनदार अजित चौगुले यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

### विद्यापीठ विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान

नॅक मूल्यांकनात माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या विकासात्मक कार्यासाठी दिलेले योगदान हा अनेक घटकांपैकी एक घटक आहे. त्यामध्ये माजी विद्यार्थ्यांनी किती रकमेचे योगदान दिलेले आहे, यावर गुणांकन अवलंबून असणार आहे. याची पूर्ण जाणीव असलेले नॅकचे सल्लागार व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. जगन्नाथ पाटील यांनी पूर्वी जाहीर केल्यानुसार १ लाख २५ हजार रुपयांचा धनादेश संघटनेकडे पाठवला आहे. तसेच पलूस येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या पदवीधरांनी १० हजार रुपये, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी २५ हजार रुपये आणि डॉ. भारती पाटील यांनी ५ हजार रुपये दिले. संघटनेचे अध्यक्ष तथा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनीही ११ हजार रुपयांची देणगी संघटनेला दिली. तसेच राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याभोवतीच्या उद्यानाच्या सुशोभीकरणाचा संपूर्ण खर्च करण्याची तयारी दर्शवली.

सकाळ

# माजी विद्यार्थ्यांमुळे विद्यापीठ जगभर

## डॉ. शिंदे; माजी विद्यार्थी संघटनेचा मेळावा; विधायक उपक्रमांचा संकल्प

कोल्हापूर, ता. २० : 'माजी विद्यार्थ्यांमुळे शिवाजी विद्यापीठाचा लौकिक जगभरात सर्वदूर पसरला आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित माजी विद्यार्थ्यांच्या मध्यवर्ती मेळाव्यात ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात मेळावा झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा भार स्वीकारल्यानंतर विविध देशांत जाण्याचा योग आला. तेथे मला विद्यापीठाचे विद्यार्थी भेटले. त्या त्या देशांचे संशोधन क्षेत्र असो अथवा अर्थकारण, या प्रत्येक क्षेत्रात आपले विद्यार्थी जागतिक स्तरावर मोलाचे योगदान देत आहेत. या पुढील काळात विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या सर्वंकष विकासामध्ये सामावून घेण्याचा संकल्प आहे.''



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित मेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''वर्तमान स्थितीत माजी विद्यार्थ्यांकडून विद्यमान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सक्रिय योगदान अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने त्यांनी अनुभवाचा लाभ द्यावा.''

डॉ. शिंदे यांच्या हस्ते माजी विद्यार्थी संघटनेच्या स्वतंत्र संकेतस्थळाचे उद्घाटन झाले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी उपक्रमांचा आढावा घेतला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. संघटनेचे सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, संघटनेचे खजिनदार अजित चौगुले यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

### संघटनेला भरभरून मदत

**नॅकचे सल्लागार व माजी विद्यार्थी डॉ. जगन्नाथ पाटील यांनी १ लाख २५ हजार रुपयांचा धनादेश संघटनेकडे पाठविला. पलूस येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या पदवीधरांनी १० हजार, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी २५ हजार, तर डॉ. भारती पाटील यांनी ५ हजार दिले. संघटनेचे अध्यक्ष, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ११ हजार रुपयांची देणगी संघटनेला दिली. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याभोवतीच्या उद्यानाच्या सुशोभीकरणाचा खर्च करण्याची तयारी दर्शविली.**

Kolhapur, Main
21/10/2018 Page No. 102